GR- 200407261400140001-0500

**अध्ययन अक्षमता असलेल्या शालेय विद्यार्थ्यांना द्यावयाच्या सवलती**

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण विभाग
शासन निर्णय क्रमांक संकीर्ण १०२१/(१५/२००१)/ प्राशि-५
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२
दिनांक : १३ नोव्हेंबर, २००१

वाचावे :-
१ शासन निर्णय क्रमांक सीपीटी २०००/३५०६/१३१०/ प्राशि-२, दिनांक १६ जानेवारी, २००१
२ शासन निर्णय क्रमांक एसएससी १०९९/(१५१/९९)/ उमाशि-२,दि. २८ नोव्हेंबर २०००
३ शासन पत्र क्रमांक संकीर्ण २००१/(१५/२००१)/ प्राशि-५, दिनांक १ मार्च २००१
४ संचालक, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे यांचे अर्धशासकीय पत्र क्रमांक मराशैसंप्रप/ अविवि/ डिसलेक्सिया २००१/(२८५८)/ दिनांक २७.९.२००१

**शासन निर्णय :-** अध्ययन अक्षमता असलेल्या विद्यार्थ्यांमध्ये डिसलेक्सिया, डिसग्राफिया व डिसकैल्कुलिया या प्रकारातील विद्यार्थ्यांचा समावेश होतो. अध्ययन अक्षमता असलेल्या शालेय विद्यार्थ्यांना देण्यात येणा-या शैक्षणिक सवलतीचे एकत्रिकरण करुन एक सर्व समावेशक शासन निर्णय यापूर्वी दिनांक २८ नोव्हेंबर, २००० रोजी निर्गमित करण्यात आला आहे.

अध्ययन अक्षमता असलेल्या विद्यार्थ्यांच्या प्रश्नाचा विचार करुन त्यांना शालेय शिक्षणाचा मुख्य प्रवाहात आणण्याच्या दृष्टीने व मा.उच्च न्यायालयास अहवाल सादर करण्यासाठी दिनांक १६ जानेवारी २००१ च्या शासन निर्णयान्वये समिती गठीत करण्यात आली . या समितीने केलेल्या शिफारशी विचारात घेऊन अध्ययन अक्षमता असलेल्या विद्यार्थ्यांना पुढीलप्रमाणे सवलती देण्याचा निर्णय शासनाने घेतलेला आहे -

१. या विद्यार्थ्यांना वार्षिक परीक्षेत एक तासाच्या पेपराला २५ टक्के जादा वेळ (१५ मिनिटे) २ तास किंवा अधिक वेळेच्या पेपराला जास्तीत जास्त ३० मिनिटे जास्त वेळ देण्यात यावा.

२. अध्ययन अक्षमता असलेल्या या विद्यार्थ्यांना इयत्ता १० वीमध्ये इयत्ता ७ वीचे अंकगणित (७५ गुण) व कार्यानुभव(७५ गुण) अशी एकूण १५० गुणांची परीक्षा

घेण्यात येते. याच धर्तीवर इयत्ता ८वीसाठी इयत्ता ५ वीचे अंकगणित (७५ गुण) + कार्यानुभव (७५ गुण) व इ.९वी साठी, इयत्ता ६ वीचे अंकगणित (७५ गुण) + कार्यानुभव (७५ गुण) याप्रमाणे इयत्ता ८ वी व ९ वीसाठी १५० गुणांची परीक्षा घेण्यास परवानगी देण्यात येत आहे.

३. अध्ययन अक्षमता असलेल्या विद्यार्थ्यांना महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या अभ्यासक्रमात मान्य असलेल्या कोणत्याही विषयाबाबत जेथे आवश्यक आहे तेथे मुख्याध्यापकांच्या मान्यतेने ते कार्यानुभव विषय बाह्य शासन मान्य खाजगी संस्थांकडून पूर्ण करता येईल. तथापि संबंधित विद्यार्थ्यांना तो कार्यानुभव विषय येतो आहे किंवा नाही याची खात्री त्या शाळेच्या मुख्याध्यापकांनी करावी.

४. विभागीय शिक्षण उपसंचालकांनी संबंधित विद्यार्थ्यांची अध्ययन अक्षमतेबाबत योग्य त्या वैद्यकीय अधिका-याच्या प्रमाणपत्रानुसार विद्यार्थ्यांना अध्ययन अक्षमतेच्या संवर्गात असल्याचे प्रमाणित करावे. तसेच या सवलतीबाबत शिक्षणाधिकारी (प्राथ.)/(माध्य.) यांनी त्यांच्या क्षेत्रातील शाळेच्या मुख्याध्यापकांना तपशीलवार सूचना द्याव्यात. या वर्गातील पात्र विद्यार्थी शासनाने मान्य केलेल्या सवलती पासून वंचित राहणार नाही याची दक्षता घ्यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( शा.पां.जोशी )
उपसचिव, महाराष्ट्र शासन

प्रति :
शिक्षण संचालक (प्राथ.) महाराष्ट्र राज्य, पुणे
शिक्षण संचालक (माध्य) महाराष्ट्र राज्य, पुणे
संचालक,महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे
सर्व विभागीय शिक्षण संचालक
अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, शिवाजीनगर, पुणे
सर्व विभागीय सचिव, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ
सर्व शिक्षणाधिकारी (प्राथ./माध्य.)
श्रीमती के.एस.दलाल,डिसलेक्शिया असोसिएशन, १४, करंजा हाऊस दुमाईन रोड, कुलाबा, मुंबई ५
संचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई (वर्तमानपत्र प्रसिध्दीसाठी)
निवड नस्ती, प्राशि-५